स्थायी समितीच्या **शनिवार दिनांक 23—08—2014** रोजी **सकाळी 11—30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 3. | सौ. सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 4. | सौ. भावना प्रशांत ढाकणे | सदस्या |
| 5. | श्री. हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 6. | सौ. सविता मनोज सांगोळे | सदस्या |
| 7. | श्री. सागर दामोधर लोखंडे | सदस्य |
| 8. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 10. | सौ. संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 11. | श्रीमती इशरद नाहीद मो. जलील अंसारी | सदस्या |
| 12. | सौ. सिंधु रामा उईके | सदस्या |
| 13. | सौ. रविंदर कौर बावा | सदस्या |
| 14. | श्री. देवा प्रसाद उसरे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. दुनेश्वर सुर्यभानजी पेठे | सदस्य |
| 2. | श्री. प्रशांत रामराव धवड | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंतकुमार पवार, अपर आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 116</u> :— प्रभाग क्र. 45 (अ) वाठोडा गांवामध्ये नाल्याचे बांधकाम करण्यास्तव रू. 49,98,890/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व पद क्र. A43901370812 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 117</u>** :– महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाकरीता 12 नग नविन टिप्पर खरेदी करण्याकरीता रू. 192.0 लक्ष राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा व तद्नंतर निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 118</u>** :– प्रभाग क्र. 8 (ब) मधील बोरगांव चौक ते शारदामाता चौक आणि पटेलनगर येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. 26,15,400/– (सव्वीस लक्ष पंधरा हजार चारशे फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 119</u>** :– प्रभाग क्र. 8 (ब) मधील प्रशांत कॉलनी येथील नाल्याच्या भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रू. 29,30,000/– (एकोनतीस लक्ष तीस हजार फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 120</u>** :– प्रभाग क्र. 26 अंतर्गत महाराजबाग येथे कंझरवेनसी लेन दुरुस्ती करणे तसेच गडर लाईन टाकण्याचे कामास्तव प्राप्त निविदा पैकी मे. अमित कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 6.3 टक्के कमी दराची असुन रु. 4684573/– (छेचाळीस लक्ष चौऱ्याऐंशी हजार पाचशे त्र्याहत्तर ) रकमेची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 619 A43901371913 अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रु.4684573/– पर्यंत चा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 121</u>** :– नागपूर महानगरपालिका, नागपूर अंदाजपत्रक 2014–15 अंतर्गत सतरंजीपुरा झोन क्र. 7 क्षेत्रीय कार्यालयास महसुली खर्च रू. 197.00 लक्ष (पदनिहाय रकमेची बेरजे नुसार) व भांडवली खर्च रू. 483.00 (पदनिहाय रकमेच्या वेरजे नुसार) असे एकुण रू. 680.00 लक्ष उपलब्ध झालेले आहे. या अनुषंगाने प्रभाग निहाय व झोनल पदनिहाय महसुली व भांडवली खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेल्या पदनिहाय अंदाजपत्रकास प्रभाग समिती ठराव क्र. 2 दिनांक 11.08. 2014 अन्वये मंजुरी प्राप्त आहे, त्यास स्थायी समितीची मंजूरी आवश्यक असल्याने सोबत जोडलेल्या अदाजपत्रकास मंजुरी देण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 122</u>** :– स्थायी समिती म.न.पा. यांचे सन 2014 –15 चे अंदाजपत्रकात झोन क्र. 1 लक्ष्मीनगर क्षेत्रीय कार्यालया करीता प्रभाग समिती पदाअंतर्गत भांडवली खर्चाकरीता रू. 459.00 लक्ष व महसुली खर्चाकरीता रू. 197.00 लक्ष अशाप्रकारे एकुण रू. 656.00 लक्ष तरतूद उपलब्ध केलेली आहे. त्यानूसार भांडवली तथा महसुली खर्चाची आवश्यकतेप्रमाणे प्रभाग निहाय राशी मा. नगरसेवक हयांनी सुचविल्यानुसार करण्यात आलेली तरतूद वितरीत करून सोबत संलग्न आहे. कार्यात्मक समूहामध्ये केलेला अंतर्गत फेरबदल परीशिष्ट अ व ब मध्ये नमूद असून मुळ व सुधारीत तरतूद ही मा. स्थायी समितीचे अंदाजपत्रकाप्रमाणेच आहे.

करीता लक्ष्मीनगर झोन क्र. 1 मधील भांडवली तथा महसुली खर्चाचे तरतुदीचे सोबत संलग्न **परिशिष्ट** अ व ब प्रमाणे प्रभाग निहाय आवंटनास प्रभाग समितीचा ठराव क्र. 04 दिनांक 31.07.2014 नुसार मंजूरी प्राप्त असून सदर प्रस्तावास स्थायी समितीची मंजूरी प्रदान करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 123**</u> :– हनुमान नगर झोन क्र. 3 क्षेत्रिय कार्यालय नागपूर महानगरपालिका सन 2014–15 चे अंदाजपत्रकात एकुण तरतुद रु. 678.00 लक्ष (अक्षरी सहा कोटी अठयाहत्तर लाख) केलेली आहे. प्रभाग समिती ठराव क्र. 7 दिनांक 08.08.2014 अन्वये अंदाजपत्रकात फेरफार करुन मंजुर करण्याचे अधिकार मा. सभापती यांना देण्यात आले. मा. सभापती, प्रभाग समिती यांना दिलेल्या अधिकारानुसार त्यांनी अंदाजपत्रक तयार केले असून सोबत जोडलेले **परिशिष्ट** 'अ' प्रमाणे अंदाजपत्रकास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 124**</u> :– प्रभाग क्र. 39, ब, महात्मा गांधी येथील इतवारी भागातील बापुराव गल्ली, दत्त मंदिर, जैन मंदिर गल्ली व माता मंदिर सुदाम गल्ली मध्ये सिमेंट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रू. 27,91,258/– (अक्षरी सत्तावीस लक्ष एक्यान्नव हजार दोनशे अठ्ठावन रूपये) रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. 682 व नविन पद क्र. A22001330803 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 125**</u> :– प्रभाग क्र. 39, ब, महात्मा गांधी येथील नबाबपुरा, चितार ओळ व हत्तीनाला भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रू. 25,98,758/– (अक्षरी पंचवीस लक्ष अठ्ठयान्नव हजार सातशे अठ्ठावन रूपये) रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. 682 व नविन पद क्र. A22001330803 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 126**</u> :– प्रभाग क्र. 7 मधील संत ज्ञानेश्वर सोसायटी, संत साईबाबा सोसायटी, मलवार ले आऊट झिंगावाई टाकळी येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. 48,08,000/– (अक्षरी अठ्ठेचाळीस लक्ष आठ हजार फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावात नमुद प्रभाग क्र. 7 ऐवजी 7–ब या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 127**</u> :– बर्डी या भागात यशवंत स्टेडियम जवळ नागनदीवरील जुना पुल तोडुन नविन पुलाचे बांधकामास्तव रू. 5,99,29,375/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. 678 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच या कामास्तव म.न.पा. मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार मे. क्रियेशन्स इंजिनिअर्स प्रा.लि. यांची म.न.पा. च्या मंजूर दरावर नेमणुक करण्याचा व प्रचलित दरानुसार सेवाशुल्क प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 128**</u> :– वाहतुक पोलिस नागपूर शहर अंतर्गत अधिवेशन परिसरातील मुख्य रस्त्यावरील फुटपाथ, डिवायडर व चॅनलाईझरला मॅनुफ्रॅक्चर्र किंवा ऑथराईज डिलर कडून सिंथेटीक ईनॅमल ऑईल पेंटींग करण्याच्या कामास्तव रूपये 37,00,000/– (अक्षरी सदत्तीस लक्ष फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 129**</u> :– महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाकरीता 2 नग नविन पेवर फिनिशर मशीन खरेदी करण्याकरीता रू. 60.0 लक्ष राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा व तद्नंतर निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 130** :— महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाकरीता 1 नग नविन बॅकहो लोडर मशीन खरेदी करण्याकरीता रू. 29.0 लक्ष राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा व तद्नंतर निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 131** :— महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाकरीता 1 नग नविन व्हिल लोडर मशीन खरेदी करण्याकरीता रू. 46.0 लक्ष राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा व तद्नंतर निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 132** :— महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाकरीता 2 नग नविन वायब्रेटरी रोलर @8.5MT खरेदी करण्याकरीता रू. 56.0 लक्ष राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा व तद्नंतर निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 133** :— नेहरूनगर झोन क्र. 5 सन 2014—15 च्या प्रभाग समितीने पुनर्विनियोजनासह प्रस्तावित केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. प्रभाग समितीने प्रस्तावित केलेल्या अंदाजपत्रकाची प्रत (परिशिष्ठ अ व ब) सोबत जोडली आहे.

(परिशिष्ठ "अ" ला फक्त स्थायी समितीचीच मंजूरी आवश्यक असल्याने परिशिष्ठ "अ" ला मंजुरी प्रदान करणे व परिशिष्ठ "ब" ला सर्व साधारण सभेची मंजुरी आवश्यक असल्याने मंजुरीस्तव सर्वसाधारण सभेकडे सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन ज्या उद्देशाने विभागाने परिशिष्ठ 'ब' चे पुर्नर्विनियोजनाचा प्रस्ताव सादर केला आहे. त्या दृष्टीने ज.सी.बी. मशीन खरेदी करण्याचा प्रस्ताव विभागाने तयार करुन व निविदा प्रक्रियेला सुरुवात करावी. परंतु जो पर्यंत म.न.पा. सभागृहाची मंजूरी प्राप्त होत नाही. तो पर्यंत कार्यादेश देण्यात येऊ नये याची विभागांने नोंद घ्यावी यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 134** :— नागपूर शहरातील स्वयंचलित वाहतुक सिग्नल असलेल्या चौकात पेडेस्ट्रियन क्रॉसींगची आखणी करण्याच्या कामास्तव रूपये 49,83,000/— (अक्षरी एकोणपन्नास लक्ष त्र्यांएशी हजार फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 135** :— प्रभाग क्र. 8 (अ) संगमनगर येथील पुलाचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. एन.एन. बेलखुडे यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा 15.99 प्रतिशत कमी दराची रू. 52,29,407/— (अक्षरी बावन लक्ष एकोनतीस हजार चारशे सात फक्त) दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 136** :— झोन क्र. 8, प्रभाग क्र. 32 ब, मधील क्वेटा कॉलनी व रामपेठ वस्तीमध्ये विविध ठिकाणी खांब लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता ई—निविदा बोलविल्या असता, प्राप्त चार (4) निविदांपैकी मे. राहुल कंस्ट्रक्शन, नागपूर, यांची प्राकलनिय दरापेक्षा 8.7 टक्के ने कमी असलेली निम्नतम दराची म्हणजे रू. 34,97,741/— ची मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 137** :— अमर शहीद सुनील शनेश्वर स्मृती उद्यान महाल, टाऊन हॉल नूतनीकरण कामाअंतर्गत विविध विकास कामाकरिता रु. 63,92,111/— रक्कमेच्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 14 दि. 12.05.2014 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने विविध कामाच्या निविदा मागविल्या असता प्राप्त निम्नतम निविदा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निम्नतम निविदाकार | टक्के कमी / जास्त दर | निविदा राशी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1. | स्थापत्य कामे | शिवशंकर गोविंद घोराडकर | 16 % कमी | 23,66,703 / — | 1% अतिरिक्त सुरक्षा ठेव + 2% सुरक्षा ठेव जमा करण्याचे अटीवर |
| 2. | हार्टीकल्चरल कामे | डी.जी.चोखट | 11.21 % कमी | 4,68,349 / — | ———— |
| 3. | खेळणी लावणे | मेहुल ट्रेड लिंक | 36.7 % कमी | 6,11,700 / — | 21.7% अतिरिक्त सुरक्षा ठेव जमा करण्याचे अटीवर |
| 4. | खेळणी परिसरात रबर फ्लोरींग (EPDM) | इकोफ्लेक्स सरफेसेस प्रा.लि. मुंबई | प्राकलनीय राशी | 11,61,948 / — | वाटाघाटीव्दारे दर कमी करण्यात आले. |
| 5. | म्युजीक चॅनेल सिस्टीम | मे. डिव्हायसेस इलेक्ट्रोटेक्नीका | 09 % कमी | 5,76,376 / — | —— |
| | | | एकूण रु. | 51,85,076 / — | |

प्राप्त वरील प्रमाणे एकत्रित राशी रु. 51,85,076 / — च्या निम्नतम निविदांना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 138</u>** :— प्रभाग क्र. 60 (ब) मधील संतोषी माता नगर, जुना सक्करदरा, न्यु सुभेदार नगर व गवंडीपुरा, राणी भोसले नगर येथे सी.सी. पेव्हमेंटचे बांधकाम करण्यास्तव रू. 36,05,040 / — रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व पद क्र. A22001330802 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 139</u>** :— प्रभाग क्र. 8 (ब) मधील विविध रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. 27,30,000 / — (सत्तावीस लक्ष तीस हजार फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 140</u>** :— अर्थसंकल्प 2014—2015 मंगळवारी झोन क्र. 10 करीता प्राप्त 630.00 लक्ष अंदाजपत्रक विस्तृत विवरणा मध्ये **परिशिष्ट** 'ब' प्रमाणे प्राप्त आहेत.

प्रभाग समिती, मंगळवारी झोन क्र. 10 यांनी आर्थिक वर्ष 2014—2015 चे मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन विभागाने सादर केलेल्या दुरुस्त केलेल्या प्रपत्रास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 141</u>** :— नागपूर महानगरपालिकेतील 22 नग निर्लेखित वाहने / मशिनरी, विक्री करण्याकरिता ई—निविदेअंतर्गत प्राप्त महत्तम ( Offset किमतीपेक्षा जास्त दर) दरानुसार विक्री तसेच महत्तम दराचे संबंधित निविदाकार यांनी निविदा अटी—शर्ती नुसार साहित्याची उचल न केल्यास द्वितीय महत्तम दराचे निविदाकार यांना प्राप्त प्रथम महत्तम दरावर वाहने / मशिनरी विक्री करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास स्थायी समिती ठराव क्र. 66 दिनांक 14.07.2014 अन्वये मंजूरी प्राप्त झाली. तदनंतर सहा. आयुक्त, स्थानिक संस्था कर विभागाची 6 नग मारोती जिप्सी या वाहनाची मागणी लक्षात घेवुन मा. आयुक्त यांची दिनांक 01.08.2014 रोजी निर्देश दिले त्यानुसार, 22 नग निर्लेखित वाहने / मशिनरी पैकी 6 नग मारोती जिप्सी वाहन यांची विक्री थांबवून पुन्हा कार्यरत करण्याचा व उर्वरीत 16 वाहने / मशिनरी विक्रीचा प्रस्ताव मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन त्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 142</u> :– प्रभाग क्र. 41 महाल येथील पाताळेश्वर मंदिर ते वाकर रोड पर्यंत सिमेंट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रू. 30,89,527/– (अक्षरी तीस लक्ष एकोन्नवद हजार पाचशे सत्तावीस रूपये) रकमेच्या प्राकलनास जून पद क्र. 370 व नविन पद क्र. A22001330801 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 143</u> :– वित्तीय वर्ष 2014–15 करिता म.न.पा. मंजूर अंदाजपत्रकान्वये गांधी झोन महाल क्र. 6 करिता एकुण रु. 632.00 लक्ष म.न.पा. स्थायी समिती विविध पदांअंतर्गत (महसुली व भांडवली) आंवटन केले आहे. या आधारे प्राप्त राशीची क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग निहाय व क्षेत्रीय कार्यालयाकरीता म्हणजेच रु. 632.00 लक्ष चे आवंटन प्रस्तावित केले आहे. सबब ठरावानुषंगाने रु. 632.00 लक्ष राशीचे क्षेत्रीय कार्यालयाचे वर्ष 2014–15 च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सभापतीः– मा.सदस्यांच्या रस्त्यांच्या फाईली तयार झालेल्या आहेत काय?सीएसआर मंजुर झाला आहे काय?

श्री.गायकवाड(नगरयंत्री):–मा.सभापती, रस्त्यांचा सीएसआर मंजुर झालेला आहे. रस्त्यांच्या फाईल सुध्दा तयार झालेल्या आहेत.

सभापतीः– मा.स्थायी सदस्यांच्या रस्त्यांच्या कामाचे प्रोव्हीजन अबाऊ झाले असेल तर त्याचे रजिस्टर वेगळे करून स्थायी समितीच्या फाईल खतविण्यात याव्या. एक बाब अशी, इलेक्ट्रिक कामाच्या फाईलच्या संदर्भात जेथे प्रभाग नंबर टाकण्याचे सुटले आहेत ते देण्यात यावे.

श्रीमती कौरः– मेरे प्रभाग में नझुलकी जगह है वहॉ अशोक नाम का व्यक्तिने सुवर पाले है ।वह पूरे इलाके में घूमते है । उससे एक्सीदंड होते है । पिछली बार सुवर ने एक बच्चें को काटा था। झोन में कम्पलेंट देने के बाद भी कोई कार्यवाही नही होती । जब झोन की तरफ से कार्यवाही करने जाते है सारे सुवर गायब कर देते है । उनको पहले ही इसकी जानकारी मिल जाती है । इस समस्या पर ॲक्शन ली जाय ।

सभापतीः– पुर्ण तपासणी करून कार्यवाही करण्यात यावी.

श्री. उसरे :– अध्यक्ष महोदय हम लेटर पब्लीक के काम के लिये हमारे झोन के सहा. आयुक्त कराडे निर्णय नही लेते नगरसेवकों को चार चार घंटे बैठालकर रखते हैं ।

श्री.कराडे(सहा.आयुक्त):– मा. सभापती, मा.सदस्यांना माझ्या टेबलवर दोन तास लागले. फाईल तयार झालेली आहे. काम लवकर होण्याच्या दृष्टीने कामाच्या चार फाईली तयार करा असे म्हटले परंतु यांनी फक्त दोनच फाईली तयार केल्या आहेत.

श्री. उसरे :–यह बात अपने इंजिनियर को भी बता सकते है ।

श्री.कराडे(सहा.आयुक्त):— मा. सभापती, काम लवकर करण्याच्या दृष्टीने36 लक्ष रू. च्या चार फाईली बनविण्यात याव्या असे सांगितले.

सभापती:—यानंतर अशा प्रकारची तक्रार येता कामा नये.

श्री.बंडू तळवेकर:— मा. सभापती, एक हॉटमिक्सचा विषय आहे. मी चार पत्रे लावलेली आहेत. ज्या ठिकाणी 12 मिटरच्या वरचे रस्ते आहे. माझ्या परिसरातील टिपू सुलतान चौक, राणी दुर्गावती चौक तसेच यशोधरानगर येथील उर्दु शाळेजवळील रस्ता आहे. या रस्त्याने शाळेची मुले चालू शकत नाही. पिवळी नदी जुना पुलिया गॅस गोडाऊनच्या रस्त्याने सायकलवाला सुध्दा जावू शकत नाही अशी परिस्थिती या रस्त्यांची आहे. रस्त्यावर इतक्या मोठया प्रमाणात खड्डे पडलेले आहेत. एकता नगर, शिवशक्तीनगर या परिसरात मुरूम टाकावा लागेल.

सभापती:— मा. सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात यावे. भांडेवाडी हॉटमिक्स प्लॉन्टचे काय झाले.

श्री.गुप्ता(उप अभियंता):—मा.सभापती, हॉटमिक्स प्लॉन्टचा ड्रममिक्स प्लॉन्ट आधी होता आता बॅचमेंट प्लॉन्ट करण्याचा प्रस्ताव दिला आहे.

श्रीमती सांगोळे:—मा.सभापती, कामगार नगर येथे बाजाराचा जो रस्ता आहे त्या रस्त्यावर फार खड्डे पडलेले आहेत. तसेच प्रभागात 350 पथदिवे बंद आहेत. आज लाईट बदलला तर उद्या बंद होतो. असा हा काय प्रकार सुरू आहे. अशाप्रकारचे साहित्य कां वापरले जाते की आज लावलेला लाईट दुस—या दिवशी बंद होतो. आम्हांला नेहमीकरिता एक चेकर देण्यात यावा.

श्री.जैस्वाल(कार्य.अभि.):— मा.सभापती, मा.सदस्यांच्या प्रभागात कुठे लाईट बंद आहेत ते बघुन घेण्यात येईल. आता आपण एलएलडी लाईट लावण्याचा कॉन्ट्रॅक्ट एका कंपनीला दिला आहे.

सभापती:— लाईट चेक करण्याकरिता चेकरला मा.सदस्यांच्या प्रभागात पाठविण्यात यावे. बंद लाईटविषयी कंपनीला सांगण्यात यावे. एलएडीचे किती लाईट लागलेले आहेत.

श्री.जैस्वाल(कार्य.अभि.):— मा.सभापती, आता कॉन्ट्रॅक्ट दिला आहे. कॉन्ट्रॅक्ट पुर्ण करण्यासाठी 18 महिन्याचा कालावधी दिला आहे.

सभापती:— कंत्राट देवून चार महिने झाले, याची प्रोसेस काय आहे.

श्री.जैस्वाल(कार्य.अभि.):— मा.सभापती, सॅम्पल बेसिसवर दिक्षाभुमी येथे काम सुरू आहे. इफेक्ट दिसण्याकरिता दोन—तीन महिने लागतील. कंत्राटदाराला 18 महिन्याचा कालावधी दिला आहे.

श्री. बंडू तळवेकरः— मा. सभापती, झोननिहाय स्ट्रीट लाईट लावण्याचा कंत्राट आपण यापूर्वी दिला आहे. तसेच एलएलडी लाईट सुध्दा लावण्याचा कंत्राट आता दिला आहे. हा विषय फार गंभीर आहे. यासाठी झोननिहाय जी काही फिटींग लावावयाची आहेत तसेच आऊटर वार्ड आणि स्लम एरियामध्ये फिटींग लावावयाच्या आहेत. प्रशासनाने ही माहिती द्यावी की स्ट्रीट लाईटकरिता त्या ठिकाणी फिटींग लावावयाच्या आहेत किंवा नाही.

सभापतीः— हा फार गंभीर विषय आहे. स्थायी समितीची सोमवारी बैठक आहे त्या बैठकीत आऊटर भागात स्ट्रीट लाईट लावणे गरजेचे आहे या विषयावर चर्चा करण्यात येईल.

ठराव क्रमांक 144 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर | सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर |